CMYK

हारकी लिमगावातून शेतकरी गायब

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील हारकी लिमगाव येथील शेतकरी नटेश्वर मुकुंद बेदरकर हे दि.२२ फेब्रुवारी रोजी अचानक गायब झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. दरम्यान, या प्रकरणी पोलीस स्थानकात रितसर तक्रार नोंदविली आहे. त्यांच्या गायब झाल्याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही.

याबाबत शिवाजीनगर पोलीस ठाणे बीड येथे बेदरकर कुटुंबियांनी रितसर तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मारोती खेडकर हे कसून तपास करत आहेत. दरम्यान, नटेश्वर बेदरकर यांच्या अचानक गायब होण्याने संपूर्ण बेदरकर कुटुंबीय भितीच्या सावटाखाली वागत आहेत. तालुक्यातील हारकी लिमगाव येथील शेतकरी नटेश्वर मुकुंद बेदरकर हे दि.२२ फेब्रुवारी रोजी अचानक गायब झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. दरम्यान, या प्रकरणी पोलीस स्थानकात रितसर तक्रार नोंदविली आहे.

Mob.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

आरंभ

संपादक : दिपक थोरात

शेतकऱ्यांनी ई-पिक पाहणी मुदतीत करावी

वडवणी । प्रतिनिधी

तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील ई-पीक पाहणीचे प्रलंबित कामकाज आपल्या गावचे ग्रामसहसूल अधिकारी यांचे सहायक मार्फत करण्यात येत असून शेवटची तारीख दि.२८ फेब्रुवारी आहे. सर्व शेतकऱ्यांनी पीक पाहणी करुन घ्यावी, असे आवाहन तहसीलदार वैभव महिंद्रकर यांनी केले आहे. ॲग्रीस्टॅक अंतर्गत शेतकरी ओळख क्रमांक नोंदणी, नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्र येथे सुरू - आहे. प्रत्येक शेतकऱ्यास ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी (शेतकरी ओळख क्रमांक) काढणे अनिवार्य आहे. यापुढील काळात शेतकऱ्यांना पी.एम.किसान योजना, पीक विमा, नैसर्गीक आपत्ती अनुदान, पिक कर्ज व इतर शासकीय योजनाचा लाभ घेण्यासाठी ही नोंदणी आवश्यक आहे. नोंदणी न केल्यास शेतकऱ्यांना कुठल्याही शासकीय योजनांचा लाभ मिळणार नाही.

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - १६० ■ बुधवार दि. २६ फेब्रुवारी २०२५ ■ आरएनआय - एमएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 160 ■ Wednesday Dt. 26 February 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

मस्साजोग ग्रामस्थांचे अन्नत्याग आंदोलन मागे

सरपंच स्व. संतोष देशमुख हत्या प्रकरणात उज्वल निकम यांची नियुक्ती

राज्य सरकारकडून उज्वल निकम यांची नियुक्ती

दरम्यान बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे आणि

आमदार सुरेश धस यांनी आज ग्रामस्थांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. प्रशासनाकडून आंदोलकांची एक प्रमुख मागणी मान्य करण्यात आली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात सरकारकडून उज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यामुळे ग्रामस्थांचा प्रशासनावर विश्वास बसला आणि त्यांनी आंदोलन मागे घेतले असे गावकऱ्यांच्या वतीने सांगण्यात आले आहे. मात्र ग्रामस्थांनी आपले मत मांडत प्रशासनाला वेळ देऊन इतर मागण्या देखील मागण्या पूर्ण कराव्यात अशी विनंती करण्यात आली आहे.

शिष्टमंडळ जे ठरवेल ते मला मान्य - धनंजय देशमुख

मृत संरपंच संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख म्हणाले की, संतोष देशमुख हे गावचे सरपंच होते आणि हे गाव त्यांचे कुटुंब आहे. या गावाने संतोष देशमुख यांच्या न्यायासाठी अन्नत्याग आंदोलन केले. या आंदोलनात मी आणि माझे कुटुंब सहभागी झालो आहोत. आमच्या या आंदोलनात पाठिंबा देण्यासाठी सुरेश धस, बजरंग सोनवणे हे आले आहेत. आमचे शिष्टमंडळ जे ठरवेल ते मला मान्य आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या मस्साजोगमध्ये मृत सरपंच संतोष देशमुख यांच्या न्याय हक्कासाठी ग्रामस्थ मंगळवारपासून सामुहिक अन्नत्याग आंदोलनानाला बसले होते. या आंदोलनामध्ये सरपंच संतोष देशमुख यांचे कुटुंब देखील सहभागी झाले होते. मराठा आरक्षणाचे नेतृत्व करत असलेले मनोज जरांगे पाटील यांनी देखील या आंदोलनाला पाठिंबा दिला होता. बीडच्या एसपींनी आंदोलन स्थळी संतोष देशमुख यांच्या भावाशी चर्चा करून त्यांना त्यांच्या मागण्याच्या अनुषंगाने आश्वासन दिले होते. आज बीडचे अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी लिखित आश्वासन देत आंदोलक ग्रामस्थांना तूर्तास आंदोलन स्थगित करण्याची विनंती केली. यानंतर ग्रामस्थांनी अन्नत्याग आंदोलन मागे घेतले आहे.

आम्ही सखोल चौकशी करत आहेत - पांडकर

बीडचे अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी यांनी सांगितले की, या केसचा तपास हा सीआयडी कडत आहे. मात्र यापूर्वी एसपी सरांनी शिष्टमंडळाशी बातचीत केली आहे आणि आश्वासन देखील दिले आहे. आम्हाला जी काही गोपनीय माहिती मिळत आहे, त्यावर आम्ही सखोल चौकशी करत आहेत. मात्र या प्रकरणात ज्या काही कारवाया कराव्या आहेत, त्या सर्व सीआयडी अधिकारी यांच्याकडे असल्याने या प्रकरणात तेच कारवाई करणार आहेत.

उज्ज्वल निकमांच्या नियुक्तीसाठी मुख्यमंत्र्यांचे आभार - आ. धस

आमदार सुरेश धस यांबेळी बोलताना म्हणाले की, या प्रकरणात बाजू मांडण्यासाठी उज्वल निकम यांची नियुक्ती करण्यासाठी मागणी होती. मुख्यमंत्र्यांनी उज्वल निकम यांची नियुक्ती केली आहे. यासाठी मुख्यमंत्र्यांचे आभार तसेच या केसमध्ये आपली सहमती दर्शवली यासाठी उज्वल निकम यांचेही आभार असे धस म्हणाले. तसेच ग्रामस्थांच्या ज्या मागण्या आहेत आणि जे सह आरोपी आहेत त्यांना देखील आरोपी करण्यात यावे असे देखील धस म्हणाले.

या प्रकरणात मूळ शोधले पाहिजे - बजरंग सोनवणे

खासदार बजरंग सोनवणे म्हणाले की, या प्रकरणात जे

मूळ आहे त्यावर तपास झाला पाहिजे. २८ मे रोजी जी घटना झाली, त्यामध्ये एक आरोपी अद्याप पोलिस अधिकारी यांना सापडला नाही म्हणून हा विषय वाढला आहे. २९ नोहेंबर रोजी खंडणीचा गुन्हा दाखल झाला असता तर ६ डिसेंबर रोजी अट्रासिटी दाखल झाली असती. असे झाले असते तर ९ डिसेंबर रोजी संतोष देशमुख यांची हत्या झाली नसती. त्यामुळे याची सारखळी तपासणे गरजेचे आहे. यासाठी आपण एस पी यांना पत्र देणार आहोत, असे देखील ते म्हणाले.

संघर्ष पत्रकार संघांचे उपाध्यक्ष पत्रकार सचिन साखरे यांची महाराष्ट्र रत्न गौरव आदर्श युवा पत्रकार पुरस्कारासाठी निवड

केज । प्रतिनिधी

संघर्ष पत्रकार संघांचे उपाध्यक्ष तसेच परळी वार्ता चे जिल्हा प्रतिनिधी पत्रकार सचिन साखरे यांची दैनिक शिवजगार, विश्वनाथ फाउंडेशन व इन्फोडाड राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न गौरव आदर्श युवा पत्रकार पुरस्कार २०२५ साठी निवड करण्यात आली आहे हा पुरस्कार २८ फेब्रुवारी २०२५ रजी सावित्रीबाई फुले स्मारक, संस्कृतिक भवन गंजपेठ पुणे या ठिकाणी विविध मान्यवरांच्या हस्ते देण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाला उदघाटक म्हणून मा. ना. श्री. अतुलजी साबे साहेब, इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास अपारपरिक ऊर्जा मंत्री, महाराष्ट्र राज्य, प्रमुख पाहुणे म्हणून मा. खा. श्री. निलेशजी लंके साहेब, खाजदार अहिल्यानगर महाराष्ट्र राज्य, प्रमुख पाहुणे म्हणून मा. खा. श्री. बजरंग बप्पा सोनवणे साहेब खासदार बीड लोकसभा, मा.श्री. उद्धव बापू अपेगावकर साहेब, सुप्रसिद्ध पाखवाज वादक महाराष्ट्र राज्य, मा. श्री. श्रीकांत डिसले साहेब, सहायक पोलीस आयुक्त छत्रपती संभाजी नगर, याच बरोबर अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमाचे संयजोक ॲड.शंकर शेषेराव चव्हाण, विश्वनाथ फाउंडेशन, दैनिक शिवजगार इन्फोडाड यांनी केल आहे. हे मागील अनेक वर्षा पासून सामाजिक, राजकीय, कला, संस्कृतिक, क्रीडा, पत्रकारिता, आदर्श ग्रामपंचायत, अशा अनेक क्षेत्रातील चांगले कार्य करणाऱ्यांना पुरस्कार देऊन सन्मान करतात. या वर्षीचा महाराष्ट्र रत्न आदर्श युवा पत्रकार पुरस्कार संघर्ष पत्रकार संघ केज चे उपाध्यक्ष पत्रकार सचिन धनराज साखरे यांना मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व क्षेत्रातील हितचिंतक यांच्या अभिनंदन करण्यात येत आहे.

लहुजी शक्ती सेनेचे शनिवारी पुण्यात पहिले राष्ट्रीय महाअधिवेशन : क्षीरसागर

जालना । प्रतिनिधी

मातंग समाजाच्या न्याय हक्कांसाठी लढाईत अग्रेसर असलेल्या लहुजी शक्ती सेनेचे पहिले राष्ट्रीय महा अधिवेशन शनिवारी पुणे शहरातील सहकार नगर स्थित दशभुजा मैदान येथे आयोजित करण्यात आले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अधिवेशनाचे उद्घाटन होईल. अशी माहिती युवक प्रदेशाध्यक्ष सचिन क्षीरसागर यांनी दिली.

लहुजी शक्ती सेनेचे संस्थापक संस्थापक विष्णू कसबे यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या पहिल्या राष्ट्रीय महा अधिवेशनाच्या यशस्वीतेसाठी प्रदेशाध्यक्ष वैस्नव खंदारे, युवक प्रदेशाध्यक्ष सचिन क्षीरसागर, प्रदेश कार्याध्यक्ष सुभाष जाधव, महिला आघाडी प्रदेशाध्यक्षा मायाताई लोंढे, विद्यार्थी आघाडी प्रदेशाध्यक्ष ॲड. हेमंतकुमार लोंढे, यांच्या सह संघटनेच्या राज्य आणि जिल्हा निहाय पदाधिकारी व लहु सैनिकांकडून जय्यत तयारी सुरु आहे. सचिन क्षीरसागर म्हणाले, मराठवाड्यातील लाखो समाजबांधव अधिवेशनात सहभागी होणार आहेत. मातंग समाजाच्या प्रलंबित मागण्या मार्गी लावण्यासोबतच समाजाला एक नवी दिशा देणारे ऐतिहासिक अधिवेशन ठरेल, असा विश्वास सचिन क्षीरसागर यांनी व्यक्त केला. तथापि जालना जिल्ह्यातील महिला, युवक, विद्यार्थी आणि मातंग समाज बांधवांनी मोठ्या संख्येने अधिवेशनात सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष राजीव निकाळजे, संभंवप्रमुख अंकुश राजगिरे, जिल्हा कार्याध्यक्ष विनोद आठवे, शहर प्रमुख अविनाश लांडगे यांनी केले आहे.

पत्रकार उत्तम ओव्हाळ यांचा वाढदिवस साजरा

बीड । प्रतिनिधी

शहरातील रहवाशी तथा पत्रकार, बीडभूषणचे संपादक उत्तम ओव्हाळ यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने मान्यवरांच्या उपस्थित उत्साहात साजरा करण्यात आला. पत्रकार उत्तम ओव्हाळ यांच्या वाढदिवसानिमित्त प्रत्येक वर्षी सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असतात.

या वर्षी सुध्दा सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. यानंतर झालेल्या कार्यक्रमात ओव्हाळ यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन दिर्घ आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी दीपक थोरात, उद्धव आरे, मांग गारुडी समाजाचे जिल्हाध्यक्ष गोरख काळे, मीनाक्षी देवकते उर्फ डोमाळे, सनी वाघमारे, बाबासाहेब खेमाडे, लखन शिनगारे, सुरज वाघमारे, आकाश खरात, वैभव सरवदे, गौतम ओव्हाळ, रोहन वीर किरण काळे, प्रज्वल वीरसह मित्र परिवार व चाहाते उपस्थित होते. या कार्यक्रमानंतर शेवटी मान्यवर व मित्र परिवारांचे ओव्हाळ यांनी आभार व्यक्त केले.

अनिलदादांनी पालकत्व स्विकारून बीडमध्ये युवासेना मजबूत करावी : शिंदे

युवा विजय मराठवाडा दौऱ्यात बीडमध्ये पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक संपन्न

बीड । प्रतिनिधी

हिंदूहृदयसम्राट आदरणीय बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांचा आशीर्वाद घेऊन महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब, संसदरत खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या आदेशाने व युवासेना प्रमुख पूर्वेशजी सरनाईक साहेब यांच्या मार्गदर्शन नेतृत्वाखाली युवासेना आयोजित युवा विजय मराठवाडा दौरा पार पडतो आहे. या दौऱ्यात ठिकठिकाणी पदाधिकाऱ्यांच्या आढावा बैठका देखील घेण्यात येत आहे. अगदी याप्रमाणेच बीडमध्ये देखील आज युवाविजय दौऱ्यातील आढावा बैठका संपन्न होत आहेत. शिवसेना पक्षाला ताकद देण्यासाठी, पक्षाची ताकद वाढविण्यासाठी आम्ही सर्व युवांनी वज्रमुठ आवळली असून आता चाळीस वर्ष राजकारणात राहून शिवसेना पक्ष बांधणीसाठी सर्वोपरी योगदान देणारे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी एक मोठा भाऊ या नात्याने बीड जिल्हा युवासेनेचे पालकत्व स्वीकारून युवासेना मजबूत करावी असे अह्वान युवसेना मराठवाडा सचिव निलेश भाऊ शिंदे यांनी युवाविजय मराठवाडा दौऱ्याच्या पदाधिकारी आढावा बैठकीत केले.

या आढावा बैठकीसाठी युवासेना मराठवाडा सचिव निलेश भाऊ शिंदे, युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण, युवासेना मराठवाडा युवती निरीक्षक आकांक्षाताई चौंगुळे, युवासेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव, युवासेना जिल्हाप्रमुख रविराज बडे, युवा सेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे यांच्यासह शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख स्वप्नील भैय्या गलधर उपस्थित होते. जिल्हाप्रमुख रविराज बडे, युवासेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे यांनी आपल्या प्रस्ताविकता शिवसेना, युवासेना पदाधिकाऱ्यांचं स्वागत करत युवासेनेच्या कार्याचा आढावा मांडला व पुढील वाटचालीसाठी आम्हाला सहकार्य मार्गदर्शनाची आवश्यकता असून आम्ही पूर्ण ताकदीने बीड जिल्ह्यात युवासेनेची ताकद वाढवू असा शब्द दिला.

युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांनी आपल्या भाषणामध्ये अनिल दादा हे मला गुरुस्थानी असल्याचे नमूद केले तर विनाकारण आमच्या दौऱ्यामध्ये कुठलेही वैर नसताना पदाधिकारी कार्यकर्त्यांमध्ये गैरसमज निर्माण झालेले असल्याचे मत बाजीराव चव्हाण यांनी मांडले.

युवासेनेच्या सहकार्यासाठी सदैव तत्पर- अनिलदादा जगताप

शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा यांनी आपल्या भाषणात युवसैनिकांना संबोधित करताना सांगितले की, आपण महाराष्ट्रवासियांना आदर्शवत असणाऱ्या एकनाथजी शिंदे साहेबांचे कार्यकर्ते आहोत. कार्यकर्त्यांना वेळ देणे, त्यांना जपने हा शिंदे साहेबांचा स्वभाव आहे. शिंदे साहेबांनी मुख्यमंत्री असताना अडीज वर्षात अठरा अठरा तास सर्व सामन्यांसाठी केलेल्या कार्यामुळे आपल्याला गावख्येड्यात ओळख मिळाली आहे. शिंदे साहेबांमुळेच समाजात आपला आदर सन्मान वाढला आहे. हे युवसैनिकांनी लक्षात घेऊन युवासेनेची वाटचाल सुरु ठेवावी.

याबरोबरच संसदरत खासदार डॉ श्रीकांत शिंदे हे शिवसेनेचे आणि युवासेनेचे सर्व कामकाज पाहताना शिवसैनिकांना आणि युवासैनिकांना मोठा आधार देण्याचा सर्वोपरी प्रयत करतात. एवढेच नाही तर त्यांचं सातत्याने म्हणणे असतं की, जो काम करेगा वो आगे आयेगा, अगदी याच प्रमाणे युवा सैनिकांनी आपल्या कामातून मोठं व्हाव आणि आपले नेते एकनाथजी शिंदे साहेब, डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांना ताकद द्यावी. युवासेना प्रमुख पूर्वेशजी सरनाईक साहेब हे देखील युवासेनेला भरभक्कम साथ देण्यासाठी सदैव पुढाकार घेऊन काम करतात, युवासैनिकांना पुढे आणण्यासाठी नियमित धडपड करतात यामुळे युवासैनिकांनी कुठलाही किंतु परंतु न ठेवता पूर्ण ताकदीने पक्ष बांधणीच काम करावं. मी २००६ पासून शिवसेनेचे इमानदारीने काम केले असून इथून पुढे जिथे जिथे युवासेनेला माझी गरज भासेल तिथे तिथे मी युवासेनेला सहकार्य करण्यासाठी उपस्थित राहिल. असे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी आपल्या भाषणात युवासेनेला सांगितले.

CMYK